# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, १३२,बी, भोसलेनगर, पुणे – ४११ ००७.

दुरध्वनी क्रमांक / फॅक्स : 020-25510419/519 ई–मेल : mauebpune@yahoo.co.in


जा.क्र. मकृविपमं/साप्रप-२०२१/बातमी/२५८/२०२१ दि. १४/१०/२०२१

प्रति,

**मा. कुलसचिव/ उप. कुलसचिव (विद्या),**
१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
२) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४) डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली.

**विषय :- Ph.D. CET-2021 संबंधीत बातमी प्रसिध्द करणेबाबत...**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्याशाखांमध्ये २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात सुरु होणा-या आचार्य पदवी (Ph.D.) अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी **"सामाईक प्रवेश परीक्षा-२०२१",** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखांचे पदव्युत्तर विद्यार्थी आणि जे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील अंतिम पदव्युत्तर परीक्षा देतील, असेच विद्यार्थी पात्र राहतील. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठीचा कालावधी दि.२०.१०.२०२१ ते ०८.११.२०२१ असा राहील. सोबत जोडलेली बातमी प्रसिध्दीसाठी तसेच, आपल्या विद्यापीठांतर्गत ज्या महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी शिक्षण कार्यरत आहे, अशांना अग्रेषित करणेकरिता पाठवत आहे.

कळावे,

**सोबत : बातमीची प्रत**

आपला विश्वासू,

नियंत्रक
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, १३२.बी. भोसलेनगर, पुणे – ४११ ००७.

दुरध्वनी क्रमांक / फॅक्स : 020-25510419/519 ई–मेल : mauebpune@yahoo.co.in


## प्रसिध्दीसाठी परिपत्रक

(बातमी प्रसिध्दीसाठी)

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्या शाखांमध्ये शैक्षणिक **वर्ष २०२१-२०२२ साठी आचार्य पदवी (Ph.D)** अभ्यासक्रमाच्या **प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा -२०२१** महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेसाठी संबधित विद्याशाखेचे पदव्युत्तर विद्यार्थी व तसेच, सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम पदव्युत्तर परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याचा कालावधी **दि.२०.१०.२०२१ ते दि.०८.११.२०२१** असा राहील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने **`परीक्षा शुल्क`** SBI i collect link व्दारे **दि.२१.१०.२०२१ ते दि.१२.११.२०२१ या कालावधीमध्ये स्वीकारण्यात येईल.** सदर परीक्षा **दि.०५/१२/२०२१** रोजी महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत विविध केंद्रांवर आयोजित करण्यात येईल. कोरोना/कोव्हीड-१९ विषाणू साथरोगाच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक संस्थांसाठी राज्य व केंद्र शासनाने वेळोवेळी प्रसारित केलेल्या प्रतिबंधात्मक नियमावली **" मानक कार्यप्रणालींचे (एसओपी)"** काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर पात्र विद्यार्थ्यांनी स्वतः भरावयाचे आहेत. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक वाचणे अत्यावश्यक आहे. संबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. संभाव्य पात्र व अपात्र उमेदवारांची यादी **दि.१५.११.२०२१** रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले 'परीक्षा प्रवेश पत्र' सदरील संकेतस्थळावरुन **दि. ३०.११.२०२१** पासून स्वतः प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

नमुना उत्तर पत्रिका **दि. १०.१२.२०२१** व परीक्षेचा निकाल **दि.१५.१२.२०२१** रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे **http://www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी **०२०-२५५२८५१९/ ०२०-२५५२८११९** या दुरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा, असे महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे कार्यालयाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

नियंत्रक
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

दिनांक : १४/१०/२०२१
स्थळ : पुणे